प रि व र्त ना चा

# वाटसरू

वर्ष २०वे / अंक ४था
किं. २५ रु. / १६ ते ३० जून २०२०

ISSN: 2250-3145

युजीसी केअर लिस्टमध्ये परिवर्तनाचा वाटसरू पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

संस्थापक संपादक
अभय कांता*

**संपादक**
प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**
देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**व्यवस्थापकीय संपादक**
प्रशांत पवार

**संपादक मंडळ**
अवधूत डोंगरे, प्रज्वला तट्टे, वीरा राठोड, कलीम अजीम, मयुरी सामंत, अजित अभंग, राही श्रु. ग., वृषाली मगदूम

सहव्यवस्थापक
शुभम जाधव

**संपर्क पत्ता**
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११

भ्र. ७०२८२०२०९२ ईमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ४५० रु., त्रैवार्षिक : १२०० रु., दशवार्षिक : ३,५०० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वा. व. ३५० रु., सॉफ्ट + छापील ६५० रु. वरील पत्त्यावर इ मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

संपादकीय ५

समसामायिक

**शैक्षणिक संकुलाचे महत्त्व** ९

सतीश देशपांडे अनु. प्रियदर्शन भवरे, विलास भुतेकर

वर्गखोलीची विलापिका १७

मीना पिल्लई अनु. बालाजी चिरडे

**विधान परिषद** निवडणुकीच्या निमित्ताने ३३

संतोष कायंदे

विचारवेध

**अभिजन** उदारमतवाद **व फॅसिझम** ४३

बी. युवराज

पितृसत्तेच्या विळख्यात कुटुंबव्यवस्था ४९

प्रवीण घोडेस्वार

कलाव्यवहार

**सम्यक ध्वनी** ५६

संजय मोहड

अमेरिकानामा

**सीटी अपॉन हिल** ७१

मुक्ता मनोहर

# पितृसत्तेच्या विळख्यात कुटुंबव्यवस्था

प्रवीण घोडेस्वार

भारतीय समाजात कौटुंबिक नातेसंबंधांचे धागे खूप अतूट असल्याचे नेहमीच सांगण्यात येते. कौटुंबिक नातेसंबंध सामाजिक, आर्थिक आणि मानसशास्त्रीयदृष्ट्या लोकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करतात. लोकं मोठ्या अभिमानाने आपण अमुक एका

लेखक नाशिकच्या य. च. म. मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेत सहयोगी प्राध्यापक आहेत
ईमेल- gpraveen18feb@gmail.com

घराण्याशी निगडित आहोत वा ढमुक घराण्याचे वंशज आहोत असं सांगतात. समाजात लोकांचा सामाजिक दर्जा ते कोणत्या घराण्यातून आले आहेत यावर ठरत असतो. त्यामुळे लोकांचे कर्तृत्व, क्षमता, आचार-विचार, बुद्धिमत्ता, योगदान यापेक्षा त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीला जास्त महत्त्व आपल्याकडे देण्यात येतं. राजकारण व समाजकारणात याचा प्रत्यय नेहमीच येतो. आपल्या देशातल्या वेगवेगळ्या भागात कुटुंबाची संरचना आणि आकार यात आपल्याला वैविध्य आढळून येतं. विवाहाची पद्धत आणि कुटुंबातील लोकांचे अधिकार याआधारे कोणत्याही कुटुंबाचे वर्गीकरण करता येते.

देशातल्या बहुतांशी भागांमध्ये एकत्र कुटुंब पद्धती आढळून येते. यास सर्वसामान्यपणे हिंदू एकत्र कुटुंब म्हटले जातं. अर्थात मुस्लीम, शीख आणि इतर समुदायांतही मोठी आणि एकत्र कुटुंबं आढळून येतात. विशेषतः शेती व्यवसाय करणाऱ्या समाजात प्रामुख्याने मोठी आणि एकत्र कुटुंबं असतात. जेणेकरून कुटुंबातील सर्व सदस्य सोबतीने काम करतील. एकत्र कुटुंबात तीन किंवा त्यापेक्षा जास्त पिढीची लोकं सोबत राहतात. त्यांची संपत्ती सामायिक असते. स्वयंपाकघर एक असते. कुटुंबाचा प्रमुख पुरुष असतो. तोच कर्ताधर्ता असतो. पण कालानुरूप समाजात घडलेल्या बदलांमुळे एकत्रित कुटुंबातही बदल होताहेत. विशेषतः १९९०नंतर उदारीकरण, जागतिकीकरण आणि वाढत्या शहरीकरणाचे परिणाम एकत्र कुटुंबांवर व्हायला सुरुवात झाली. हिंदी चित्रपटांमध्येही याचे प्रतिबिंब उमटू लागले.